(Marathi)

1037
9/81

1583 31 P

32/3
1583
mar

# सुदर्शन-गीतें

252
1583

## भाग ३ रा.

विश्वनाथ गणेश कुळकर्णी.

1583
mar

श्री.

॥ स्वातंत्र्य-लक्ष्मी ॥

# सुदर्शन-गीतें

---

## भाग ३ रा.

रचणार:-विश्वनाथ गणेश कुळकर्णी
तरसोदकर.

शाके १८५२

---


किंमत ४ आणे

प्रकाशक

**विश्वनाथ गणेश कुळकर्णी**

मु. तरसोद, पो. नशिराबाद, जि. पूर्व खानदेश

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
23 FEB. 1931



NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1583
Date 18.1.72
GOVT. OF INDIA

मुद्रक

**विश्वनाथ जनार्दन करंदीकर.**

गोवर्धन छापखाना, ५६३ सदाशिव, पुणें २.

# अर्पणपत्रिका

हीं गीतें,

माझे स्नेही

**श्रीयुत रघुनाथ वासुदेव बोचरे,**

बी. ए. एल्एल बी., वकील, भुसावळ.

यांस

नम्र भावानें

समर्पण केलीं आहेत.

भुसावळ, सोमवार
मकर संक्रांत १८९१

" व्ही. जी. "

# अनुक्रम


१. राष्ट्रीय-ध्वज-गीत.

२. इंग्रजी राज्याचा पोवाडा.

३. माझ्या आईचा अंतकाळ.

४. स्वातंत्र्याचें रणशिंग.

५. बारडोलीचा पोवाडा.


———

श्री


# रचनेनंतरचे चार शब्द.

या सुदर्शन–गीतांचे पहिले दोन भाग "बारडोलीचा पोवाडा" व "जनताजनार्दनाच्या दोन नवीन भूपाळया" हे प्रसिद्ध झाल्यावर लोकांनीं प्रेमानें त्या सेवेचा स्वीकार केल्यावरून व या भागांतील गीतांतही खादीप्रसार करतांना व सत्याग्रह-युद्धांतील सेवा करतांना म्हटलेलीं लोकांना आवडल्यावरून प्रोत्साहन मिळाल्यामुळें प्रसिद्ध करीत आहे. बारडोलीच्या पोवाड्याची पहिली आवृत्ती संपल्यामुळें तो यांत पुन्हां दिला आहे.

वर्ष प्रतिपदा शके १८५२ भुसावळ. } विश्वनाथ गणेश कुळकर्णी.

गीत १ लें.

# राष्ट्रीय--ध्वज--गीत.



[ चाल-एकका मदन० ]

हिंद भूमीचा— वंदू हा ध्वज देशाचा. ॥ ध्रु० ॥
मंगळमूर्ती श्री गजवदना
द्यावी स्फूर्ती या ध्वजकवना
यशें मिरवूं दे भारतियांना
भारतीयांचा— हा विजय--ध्वज देशाचा ॥ १ ॥
नमत नाहिं हा कळिकाळाला
नमत नाहिं पाशवी बळाला
नमत नाहिं साधू छक्कांना
एक देवाला— नमितो हा ध्वज देशाचा ॥ २ ॥
सनातना आरक्त दर्शवी
हरितानें इस्लाम भूषवी
धवळ सकळ धर्मांस शोभवी
तीन रंगांचा— हा विजयध्वज देशाचा ॥ ३ ॥
यावरि जें शुभ्र चक्र विलसते
दीन भारता रक्षायातें
येई सुदर्शन ऐसें गमतें.
चक्र चिन्हाचा—हा विजयध्वज देशाचा ॥ ४ ॥

ध्रुव बाळाला, प्रल्हादाला
ज्या युद्धाचा विजय लाभला
तशाच समरीं हिंददेविला
विजय देणारा— हा विजयध्वज देशाचा ॥ ५
परवशतेच्या तीव्र यातना
हलवतील ज्या ज्या जीवांना
मुक्तिमार्ग दावील अशांना
आत्मशुद्धीचा— हा विजयध्वज देशाचा ॥ ६
हिंदमाइच्या ज्या तनयाला
तनु अर्पावी जनसेवेला
वाटे ऐसें तोच शोभला
पूत मायेचा— मिरवील ध्वज देशाचा ॥ ७
तरुणांच्या स्वार्थत्यागानें
श्रेष्ठांच्या तपसामर्थ्यानें
परमेशाच्या कृपाबलानें
यशस्वी झाला— हा विजयध्वज देशाचा ॥ ८ ।
आत्मबलाचा केवळ आत्मा
भारतास भूषण जो आत्मा
दुनिया ज्याला वदे महात्मा
अशा श्रेष्ठांचा— हा प्रसाद आहे साचा ॥ ९
राष्ट्राच्या प्राणांचा ठेवा
सकलांनीं हा सांभाळावा
पंचप्राणें ओंवाळावा
अशा मानाचा— वंदू हा ध्वज देशाचा ॥ १० ।

--वंदे मातरम् -

गीत २ रें.

# इंग्रजी राज्याचा पोवाडा

[ चाल-धन्य शिवाजी० ]

( या पोवाड्याची मध्यवर्ती कल्पना अशी आहे कीं, हुतात्मा जतीन्द्रासारखाच एका देशभक्ताचा अंत तुरुंगांत झाला; व मरते समयीं तो म्हणाला कीं ही माझ्या मातृभूमीची परदास्याची फिर्याद मी आतां देवापुढें मांडणार ! –

स्वर्गी जातों, प्रभुपदीं गातों, गाणें हें असलें !
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ध्रु० ॥
भारतवर्षा, पुराणपुरुषा, वंदन शेवटलें,
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें. ॥
तव सेवेची पवित्र इच्छा अजुनि नाहिं पुरली,
स्वारी मजवरि तोंचि यमाजी भास्करानें केली
परि मम मानें या मृत्यूची मज खंति मुळीं नाहीं.
यमाघरला जाऊनि येणें कुणा चुकत नाहीं !
जीर्ण यंत्र हें टाकुनि येतों, घेउनि नव तनुला,
धडा आम्हाला शिकवुनि चिलया बाळ असा गेला !

आइच्या सत्वरक्षणीं
मृत्यु नच गणीं
पडे तो रणीं

सत्वार्थ देह अर्पिला–धर्मास देह वाहिला–तो चिरंजीव जाहला.
निर्भय चिलया रत्न भारता भूषण बहु झालें
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ १ ॥

ऐका माझ्या मातृभूमिची करुण कहाणी ही !
आज जगाला जाळित सुटली हृदयज्वाला ही !
कवि-काव्याच्या लहरीसाठीं गाणें हें नाहीं !
चित्तरंजनासाठीं जनहो कवी गात नाहीं ! !
चार शिव्या इंग्रजा द्यावया रचना ही नाहीं
निंदा-स्तुतीच्या उकीरड्यावर कवी रमत नाहीं !
अन्नासाठीं आग भडकली आईच्या पोटीं,
द्वेषमत्सरादिकां जाहली राख तीन चिमटी !
मृत्यूच्या दारांत उभी जी ही भारत–माता —
खोल तिच्या हृदयांत उठे तो ध्वनि ऐका आतां
आर्त गीत तें स्पष्ट ऐकतों तुम्हा ऐकवीतों —
परमेशाला ऐकविण्याला स्वर्गीं मी जातों.

या पुण्यवंश भारतीं
आज अवनती
होतसे अती !

धोक्यांत धर्म सांपडला-धोक्यांत देश सांपडला-वाचवा प्रभो गाईला.
स्वर्गीं जातों प्रभुपदीं गातों गाणें हें असलें –
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ २ ॥

——×——

भारत-भूच्या उदरीं जन्म हें भाग्य थोर माझें –
आर्यांच्या वंशांत जन्म हें भाग्य थोर माझें !
जगा धर्मपथ दर्शविणारा आर्य धर्म माझा –
सकल सुखांचा निधी असा हा हिंद देश माझा.
**धर्म रक्षणा करतां भारत आजवरी जगला –**
**दुष्ट दण्डणा करितां भारत आजवरी जगला !**

बहुराष्ट्रांच्या उदयास्तांचा भारत साक्षी हा.
अखिल जगाचा जीवनतारा भारत माझा हा.
हिंद देश जरी सुखांत तरी जग सुखांत नांदेल
भारतीय संकट हें साऱ्या जगा गुंगवील.
ब्रम्हांडाचें सूत्र चालवी त्या भगवंताला
जग-मन-मोहन-सुरलि गावया भारत प्रिय गमला
यापरी आर्यभूवरी
कर्म-भू-वरी
अवतरे हरी
सद्धर्म जिथें प्रगटला-चित्सुखांत जो नांदला-आनंद कंद शोभला !
त्या माझ्या या प्रिय देशाला सैतानें गिळिलें
गुलाम म्हणुनि जगणें आतां असह्य मज झालें ॥ ३ ॥

---×---

कालानें जीं हिंद देविचीं सद्रत्नें गिळिलीं
दृष्टि तयांच्या दर्शनास ही आतुर मम झाली.
जीवन तारे ते स्वर्गामाधिं खेळत असतील.
स्वर्गी जाऊनि कविहि तयांसह गाऊं लागेल.
परदास्याचा डांगोरा कवि तेथें गर्जविल –
चला देव हो चला संत हो ऐसें विनवील.
एका देवा, अवताराचा आला हा काळ –
गोब्राम्हण प्रतिपालन करणें पुन्हां एक वेळ !
परशुराम-श्रीराम-मारुती-पार्थ-पृथ्विराजा !
उतरा भारत भूवरि झाला पापाचा बोजा !
प्रतापराया, शिवबा, ताना पुन्हां, वीर हो, या–
कलहाग्नीच्या प्रखर ज्वाला तुम्हीच शमवाया !

भारत-सौभाग्य-श्री-सीता-शुद्धि-कथा गाया —
तुळसिदासजी, चला भूवरी अमृत वर्षाया !
श्रीज्ञानेश्वर-एका जनार्दन-तुकाराम-दासा !
विसरुनि गेला महाराष्ट्र हा तुमच्या उपदेशा !
लोकमान्यजी, तुम्हि राष्ट्राचे सुत्रधार असतां
टाकुनि आला अर्ध्या वाटेवरि भारतमाता !
भारती देवहो चला
वीरहो चला
असुर मातला
धर्मरक्षण तुमचें ब्रीद-दुष्टदण्डन तुमचें ब्रीद-गोपाळ तुम्ही गोविंद.
हिंददेवीनें तुम्हां आणाया मजला पाठविलें !
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ४ ॥

—×—

ऐक, इंग्रजा, तूंहि ऐक हें भारतीय गाणें —
प्रभु येशूच्या पदीं आहे तुज एक वेळ जाणें !
भारतीय उद्योग बुडविला तुझ्या पूर्वजांनीं
स्वार्थापायीं, तूंहि आंधळ्या, धांवसी आडरानीं
तुझ्या गुणांचा आदर करूनी कवि विनवी तुजला
न्यायनीतिला धरूनि राज्य करि जागुनि धर्माला
स्वातंत्र्यामार्गें तूं नांदावें तुला जसें गमतें —
तसें विश्व हें स्वातंत्र्याचें आहे रे भोक्तें !
या देशाची स्वतंत्रता ही निसर्ग नियमीत
तुझें तसें या अखिल जगाचें असें त्यांत हीत
तुझ्या हितासह या देशाचें हितहि साधशील

तरि मग येथें चिरंजीव तूं सुखें नांदशील !

ही पापवासना सोड

लोभ हा सोड

मित्रता जोड

धर्मास धरूनि वागवें—सत्यास स्मरूनि वागावें—जनहितासि-
-त्वां रक्षावें

भारत-केसरी निद्रित आहे, तुला नाहीं कळलें
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ९ ॥

——×——

जगताच्या जड जठरीं आजवरि पाप नाहिं पचलें !
भारतीय परदास्य काय मग वज्र-लेप झालें
सैतानी साम्राज्य इंग्रजी भारतवर्षाला —
पचवूं पाहे परि साहे का हें त्या देवाला.
पुराणांतरीं कवी वर्णिती अघोर अन्याय
कधीं न भूतो भविष्यति असा इंग्रजि अन्याय
रंजवित जनाहिता रक्षि ती खरी राज्य-नीती
रंजवित घे जीवचि ' मूषक-बिडाल नीती " ती.
परस्व अपहारानें कोणी नाहिं जगीं तगला !
गोरा इंग्रज पापवासना धरूनि येथ आला !
कल्याणाचा आव आणिला या बक साधूनें
स्वतंत्रता-देवीचें मंदिर भ्रष्टविलें यानें !!
**सुवर्णभूच्या सुवर्णावरी पापाचा डोळा**
**ठेविति बाळें येशूचीं ही तुडविति यशमाला ।**

सर्वस्व असा अपहार

भारती घोर

होतसे फार

त्या शिकंदरा लाजविलें—नादीरशहा लाजविले-- मानवी कुला
लाजविले.

सांग प्रभो या शास्त्यांना कां तूंचि निर्मियेले !
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ६ ॥

--- × ---

दयाळु ( ? ) इंग्रज साम्राज्यानें काय पाप केलें !
न्यायनीतिच्या नांवाखालीं लोकांना लुटलें !
धर्म बुडविला, अर्थ पळविला, तेजहिन केला -
भारत माझा जगांत साऱ्या गुलाम बनवीला
प्रजाजनांच्या पंचप्राणा कासाविस केलें !
असे इंग्रजी राज्य जगामधि पहिलें हें झालें.
**या देशाचा पवित्र उद्यम अनंत वर्षांचा**
**स्वार्थापायीं गळा दाबिला इंग्रजानिं त्याचा !**
" ज्या लोकांचा देश तयांची सत्ता " हा न्याय !
हिंदभूवरी " आंग्ल " राज्य हा अघोर अन्याय !
परस्त्रियेच्या अभिलाषानें रावण मेला नां !
परधन अपहारानें सांगा वांचविलें कोणा ?
तोड भारता, तोड गुलामी पापशृंखला ही.
अशूनें या जगांत जगण्या अन्य मार्ग नाहीं.
हा ऐक दिव्य संदेश
तोडि हा पाश
थांबवी नाश
कल्याण यांत जगताचें-कल्याण भारतीयांचें-कल्याण आंग्ल
देशाचें

" भारत माझा स्वतंत्र व्हावा " कवि गर्जुनि बोले
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ७ ॥

--- × ---

इतिहासाचे साक्षिपुरावे कितीक दावावे ?
काव्याच्या विस्तार-भयानें कविमन हेलावे !
किति निर्दयता दयाळु इंग्रज वीरांनीं केली ?
गत शतकीच्या इतिहासामधिं नोंदुनि ती ठेली !
सुवर्णभूला राज्य इंग्रजी कसें वागवीतें ?
सुवर्ण अण्डीं प्रसविणारी ती हंसी आठवते !
साधाया निज हिता भारती उद्योगी जीवा –
जर्जर केलें कमीच गमतो शनि तो बारावा !
या देशाचा पवित्र उद्यम अनंत वर्षांचा –
स्वार्थापायीं गळा दाबिला इंग्रजानि त्याचा !
जुलुमाला बेजार होऊनी कलावंत मेले
ते मेले परि त्यांचे आत्मे चिरंजीव झाले !
त्या जीवांनीं निज अंगुष्ठे त्यजिलीं ज्या काळीं
इतिहासाचीं पानें झालीं त्यायोगें काळीं
**आर्यदेविच्या पुत्रांनीं त्या निज रक्तें लिहिलें –**
**अन्यायाच्या पायावरि हें राज्य थोर झालें ।**

यापरी पूर्व शतकांत
घोर कल्पांत
**जाहले येथ**

दुष्काळ पडूं लागले-दारिद्र्य फार वाढलें-आरोग्य तसें लोपलें
" धरणिमाय दे ठाव " असें हा जन आत्मा बोले !

गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ८ ॥

---×---

तरुणवीर हो, सांगा तुमचे रक्त कां न उसळे ?
तुम्हांकडे लागले आईच्या आशेचे डोळे —
सुस्तपणा हा तुमचा जाया किति डायर व्हावे ?
निरपराध निःशस्त्रजिवांचे किती बळी जावे ?
दयाळु इंग्रज राज्यामधि या जालीयनवाला —
किती दाबाव्या सांगा तुम्हा स्फुरण चढायाला !
श्रद्धानंदापरी हुतात्मे दिव्य तपो तेजें —
तळपुनि गेले तरिही तुम्हा कां कर्तव्य न उमजे ! !
धर्माच्या अभिमान जागृतीसाठीं काय हवे ?
किती सहस्रें गोमातांचें बळीदान जावें ?
अन्नान्नाच्या दशेंत सांगा किती लोक यावें ?
अन्यायाच्या माळेचे मणि कितीक मोजावे ?
विलास मोहित तुमच्या हृदयीं स्फुर्ति बोध द्याया —
यावें कां त्या सूर्याजीनें पुन्हां यत्न ठाया.

हो पूज्य आपुली माय
क्लेशि अन्याय
पाहता काय

निजधर्म आजि रक्षावा-निजअर्थ आजि रक्षावा-स्वातंत्र्यध्वज

मिरवावा·

परचक्रीं गांजलि आपुली माय काय बोले ?
गुलाम म्हणुनी जगणें आतां असह्य मज झालें ॥ ९ ॥

---×---

आर्यांच्या उद्योगभास्करा ग्रहण लागलें हें !
धर्मवीर हो पाप तुम्हाला कसें पाहवे हें ! !
स्वार्थी इंग्रज तुम्हां लुबाडिती-दोष काय त्यांचा ?
परनाशामधिं जीवन जगणें पिंड राक्षसांचा !
परकीयांच्या मायामोहें स्वदेश धर्माला –
विसरुन गेला तुम्ही आपुल्या पूर्वज कीर्तीला
इंग्रजांचिया भेदनीतिला बळी तुम्ही पडलां !
सर्वस्वासह नाश होई ! हें नवल काय ! बोला.
शस्त्रांच्या शूर गोष्टि तुम्हि करीत असतांना
भय धरितां कीं, " राजदूत त्या ऐकत नाहीं ना ?
" काय करूं करिं शस्त्र नसे " हे वृथा असति बोल.
खरा धैर्य-धर धर्मरणीं कालिकालहि जिंकील.
कवडीच्याही स्वार्थाला जे विकल्या अन्नाचे
धर्मासाठीं प्राणार्पण हें कार्य नाहीं त्यांचे

हृदयांत धैर्य वाढवा
तेज साठवा
धर्म आठवा"

आमुचा पक्ष न्यायाचा-शेवटीं विजय सत्याचा-विश्वास धरा
हा साचा

धन्य धन्य जे स्वातंत्र्याचा ध्वज मिरवित गेले.
गुलाम म्हणुनि जगणें आतां असह्य मज झालें ॥ १० ॥

----×----

ज्यांच्या हृदयीं असेल खेळत खरें आर्य रक्त
त्या सकलांना नम्र कवी हा प्रेमें विनवीत.
धर्मासाठीं-देशासाठीं आत्महितासाठीं

मायभूमिची परदास्याची तोडा हो गांठी
परदास्याच्या नर्क यातनांतुनि निजबाळांना
तरी वाचवा—स्वातंत्र्याचे सुख लाभो त्यांना !
नका भाजवू मतभेदाचे देखारे आतां !
गमेळ जमेल त्या मार्गानें साधा देशहिता.
सुरस्वाच्या बोलाहुनि जगि कृतिच बहुमोल !
खरा शिवाजी व्याख्यानें कां देतची बैसेल !
दिव्य महात्मे लोकमान्य हे दिव्य बोध करिती.
" निद्रा आतां पुरे ! होऊं या कर्तव्य-स्फूर्ति "
परमेशाचा दिव्य मंत्र हे देवदूत गाती.
" स्वावलंबना विना न कोणा स्वातंत्र्य-प्राप्ति "
परावलंबी केलें आधीं धूर्त अंग्रजांनीं
त्या योगें हा देश बांधिला दास्यशृंखलांनीं.
ते असो. बोध हा ठसो
ऐक्यता वसा.
निश्चयहि वसो.
"भारत हा मुक्त करीन-सद्धर्म जगीं वाढविन-सत्याचा ध्वज मिरवीन "
" अशी प्रतिज्ञा करा आचरा " अखेर विनविलें
गुलाम म्हणुनि जगणें आतां असह्य मज झालें ॥ ११ ॥

—— × ——

वियोग माझ्या मातृ-भूमिचा असह्य हो मजला !
परि आइच्या सेवेसाठीं जातों स्वर्गाला !
कविजनहो या हिंद देवीला सुंदर गाणीं गा.
धर्मवीर हो राष्ट्रहिताच्या लागा उद्योगा.

सुशिक्षितांनो, तुम्हीं ओळखा निज कर्तव्याला.
दरिद्र-नारायण सेवेचा लाभ तुम्हा झाला
मिश्रवरा इंग्रजा तुलाही सवाल शेवटचा.
" बिसरलास कां ! असे हिंद हा हिंदवासियांचा !"
" तेजस्वी " स्वातंत्र्य-सूर्य हा उदयाचलिं आला;
अशा कालिं हें गीत गाउन मी जाईन स्वर्गाला !

शेवटीं करा जयनाद
उद्धरा हिंद
करा आनंद

आर्य-धर्म कीं जय बोला-भारत की जय बोला- "वंदे मातरम् "
बोला.

अशी गर्जना करूनि कविनें गायन संपाविलें.
त्या वीराचे प्राणहि स्वर्गीं आनंदें गेलें ॥ १२ ॥

---- × ----

गीत २ रें.

# ' माझ्या आईचा अंतकाळ '

( माझ्या "इंग्रजी" राज्याच्या पोवाड्याप्रमाणेंच यांतही एक काल्पनिक परंतु स्वानुभवानें स्फुरलेलें स्वप्नचित्र रेखाटलें आहे. माझी आई अंतकाळच्या शय्येवर होती. आम्ही बंधु-भगिनी तिच्या सेवेंत तत्पर होतों. सतत जागरणामुळें ऐन शेवटच्या वेळीं मला जरा गुंगी आली. त्या वेळच्या स्वप्नांतून तिचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर जो बंधुभगिनींनीं आक्रोश केला त्यायोगें मी " जागा " झालों. )

" जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी "

[ चाल-केशव करणीं अघटित लीला० ]

जन्म-मृत्युच्या मार्गावरची जीवाची साउली-
खरोखर धन्य धन्य माउली ॥ ध्रु० ॥
जन्म दिला मज विश्व दाविलें जगदीश्वर दाविला,
कसा मी विसरूं त्या आईला !
अंगाईचीं गाणीं गातां शीण नाहिं मानिला-
काय मी गाणीं गाऊं तिला ?
ती माय माऊली माझी-
सोडून चालली मजला !
मायेचें माणूस आतां -
कोणि नाहिं या जीवाला
जगताची झूटी माया
हा अनुभव आहे सकलां !

मायेच्या बाजारीं मिळते माणुस पैशावरीं
परंतु माता नच दूसरी ॥ १ ॥

---×---

तव सेवेमधिं काय आई ग उणेपणा राहिला ?
कशाचा राग आला ग तुला ?
आइ ग तुझिया कृपामृतें हा बालक वाढविला !
काय टाकुनि जाशिल मला ?
गाणें हें ऐकायाला–
उठशील काय ग आई ?
शेवटचा " काऊ चिऊ "
देशील काय ग आई ?
प्रेमाचा एकच बोल–
बोलशील का ग आई ?
अनुपमेय तव सदय हृदय आजि निर्दय कां जाहलें ?
कसे ग प्रेमबंध तूटले ? ॥ २ ॥

---×---

वेडा माझा जीव तयानें आशा धरिली अशी
टाकुनि जाय माय मज कशी ?
चिरंजिवां प्रसवि जी माय ती चिरंजीव होय ना ?
असा हा मोह माझिया मना !
काल, परि जरी, माय–लेंकरा ताडातोडि न करी,
वदे का निर्दय त्या कुणि तरी ?
उगवला सूर्य मावळतो
हा प्रताप त्या काळाचा
विकसलें फूलही गळतें
हा प्रताप त्या काळाचा

अमरासहि मृत्यू येतो
हा प्रताप त्या काळाचा
चिरंजिवां जन्म दे माय ती काळमुखीं काशि पडे
कुणाला कोडें हें उलगडे ! ॥ ३ ॥

---×---

असो. विचारी मनास नसतो नश्वरांत भरंवसा
विश्व हें जळीं बुडबुडा जसा !
दुग्धामृत संपतां, आईनें, ज्ञानामृत पाजिलें
सुखाचें निधान मज दाविलें.
हरिभक्ति तिची ऐशी—
कीं ती मीराबाई दुसरी
ती राजकारणी ऐशी—
कीं राणि अहिल्या दुसरी
संसारदक्ष ती ऐसी—
कीं तिला न उपमा दुसरी.
पूर्वजन्मिच्या पुण्याईचा ठेवा होता भला
म्हणुनि अशि माय लाभली मला ॥ ४ ॥

---×---

विचार—निद्रा अशी सुंदरा स्वप्न सुमन माळिका
घेउनि आली कवि—बालिका.
मातृ-देवता स्वप्नीं येऊनि मधुर वचन बोलिली;
ऐकुनी तल्लिन मति जाहली.
"ऐकावें बाळा आतां
शेवटचे माझे बोल !
इहलोक सोडुनी आत्मा
क्षणभरांत हा जाईल

मग तुझ्या सर्वे हें ऐसें
बोलतां कसें येईल ?
जन्मभरी मज " आई " म्हणुनी प्रेमें त्वां बाहिलें--
परंतु मज नाहीं जाणिलें ! " ॥ ५ ॥

--- × ---

" जन्मभूमीच्या दिव्य शक्तिची सगुण रूप धारिणी
असे तव माय जन्मदायिनी.
अशा अनंता माता प्रसवी ती ही जगदंबिका–
उभी तुजपुढती रे बालका
काश्मीर कुमारी कन्या –
यांतुनि मी नांदे बाळा
सिंधुब्रह्मपुत्रांमधुनी –
खेळे मम घुंगुरवाळा
मी उभी हिंद भूदेवी –
मज ओळख रे वेल्हाळा !
ही तव माता जशी यमाच्या दारिं आजि पहुडली
दशा ती संप्रति मज जाहली ! " ॥ ६ ॥

--- × ---

" परके बाळा, सुवर्णभूचे सुवेंण वघ चोरिती
दरिद्री भारतास बनविती !
अन्नान्नाच्या दशेंत माझी कोट्यवधी लाडकीं !
दुःख हें असह्य मज होय की !
तेजस्वि धर्म भ्रष्टविला
परकीय राजसत्तेनें
अर्थही सर्व पळवीला
परकीय राजसत्तेनें !

मज वीर्यहीन बनवीलें
परकीय राजसत्तेनें !
ही तव माता जशी यमाच्या दारिं आजि पहुडली
दशा ती संप्रती मज जाहली.
सैतानी साम्राज्य इंग्रजी तुमच्या देशावरी —
वीर हो, साहवतें कुठवरी ? " ॥ ७ ॥

— × —

" धर्माचा, बाळांनो, तुमच्या पूर्वज सत्कीर्तिचा
धरा अभिमान जन्मभूमिचा
असता माझा शिवबा ताना प्रताप राणा अरी
आंग्ल हे नांदु न देता तरी !
तरी, तरुण हो, माझी सारी भिस्त तुम्हांवर खरी-
उद्धरा आर्यभुवन सुंदरी !
पारदास्य पाप हें भोगी
एकटीच मी जगतांत !
स्वातंत्र्य शिंग मी म्हणुनी—
फुंकिलें आजि देशांत !
या पवित्र रणिं या खेळा.
तुम्हीच व्हाल यशवंत !
उत्साहाचे, कर्तृत्वाचे तुमच्या हृदयीं झरे
तुह्मिच रे लाल बाळ मम खरे ! " ॥ ८ ॥

— × —

" धरा धैर्य हृदयामधिं सारीं सामर्थ्यें वाढवा
देव नच मेला हें आठवा.
" सत्याचा वाली परमेश्वर " बोल विसरूं हे नका
करा विध्वंस आंग्लपातका.

द्रौपदिची राखी लाज
तो जसा सुदर्शन-धारी
हें गांधि-सुदर्शन तैसें
उद्धरील मज निर्धारी
हें उद्योगामृत माझीं
पाचवील बाळें सारीं !
खादी-झेंडा धरूनि " बळुमें " बारडोलि जगविली
पापमय सत्ता ही नमविली ! " ॥ ९ ॥

—— × ——

" पुढती बाळा मज वदवेना दुर्बलता वाढली !
माय ही मृत्युपंथिं लागली !
ही तव माता सोडिल आतां नश्वर जग सत्वरीं
विवेकें शोकवेग आवरीं !
निर्गुण हा आत्माराम
सगुणरूप धरितो जैसा
या तुझ्या जन्मभूमीचा
खेळही जाण रे तैसा
मज विसरूं नको रे बाळा
जाशील कीर्तिच्या कळसा "
ऐकुनि आशीर्वचन खऱ्या त्या आइस म्यां वंदिलें !
तोंचि आक्रोशध्वनी परिसिलें ! ॥ १० ॥

—— × ——

आर्त निनादें जागृत होऊनि काय दृश्य देखिलें !
" आइनें नश्वर जग सोडिलें !
" आइ ग आई " अशि किंकाळी प्रेताच्या भोंवतीं-
बंधु मम भगिनी आक्रंदती !

" हीं तुझीं लाडकीं बाळें
टाकून कुठें ग जाते !
निष्ठुर हें मन ग कैसें
जाहले आज तव माते ?
शेवटीं एकदां उठुनी
कवटाळुनि धरि आम्हांतें !"
परि त्या देहा सोडुनि गेला जीवात्मा आइचा
आक्रमूं लागे पथ शांतिचा ! ॥ ११ ॥

—— × ——

**रडते माथा या जगताची स्वार्थासाटीं खरी**
**सर्वही वरि वरि नच अंतरी !**
मायेच्या त्या कल्लोळें कवि " तेजस्वी " जागृत
जाहला भारत–सेवा-रत.
मायेचा कोणी पूत
दिव्य गीत हें ऐकेल !
ही पीडित भारतमाता –
वंदनीय तो मानील
आईच्या मुक्तीसाठीं –
निजप्राणहि तो वेंचील.
जन्मदायिनी गेली परि ही जन्मभूमि माउली
खरोखर हृदयासनिं बैसली ॥ १२ ॥

॥ वंदेमातरम् ॥

—— × ——

गीत ४ थें.

## ' स्वातंत्र्याचें रणशिंग '

[ चाल-आनंदकंद ऐसा. ]

स्वातंत्र्य देवतेनें-रणशिंग फुंकियेलें ॥
या धर्मवीर हो या-या कर्मवीर हो या
संग्राम हा लढा या-रणशिंग फुंकियेलें ! ॥ १ ॥
धोक्यांत धर्म आहे-धोक्यांत देश आहे
ही घोषणा कराया-रणशिंग फुंकियेलें ॥ २ ॥
हें धर्मयुद्ध खेळा-स्वातंत्र्ययुद्ध खेळा
जय देवता उभी ही रणशिंग फुंकियेलें ॥ ३ ॥
परकीय राज्य मेलें-परदास्यही निमालें
ही घोषणा कराया-रणशिंग फुंकियेलें ॥ ४ ॥
हा हिंद देश माझा-झाला स्वतंत्र आतां
ही घोषणा कराया-रणशिंग फुंकियेलें ॥ ५ ॥
यशवंत व्हाल तुम्ही-जयवंत व्हाल तुम्ही
हे दिव्य नाद ऐका-रणशिंग फुंकियेलें ॥ ६ ॥

गीत ५ वें.

# बारडोलीचा पोवाडा.

( पूर्वार्ध )

( चाल-डफावरील गाण्यांची )

१

भार असह्य झाला धरणीला-बारडोलींत रावण अवतरला !! धृ० ॥
माझं अंग्रज मायबाप सरकार-असं दयाळु राजा नाहिं होणार !
चित्त देऊन ऐका सादर
काय न्यायनिती वानुं-किती उपकार मानुं ?
भार असह्य झाला धरणीला-बारडोलींत रावण अवतरला ॥

२

चौदा चौकडि रावण तोहि मेला-कोणि अमरपट्टा नाहिं आणला !
मृत्युजन्माच्या संगें जन्मला !
ज्यानें जगांत यावें-त्याला लागेल जावें !
परि विसर पडला इंग्रजाला-बारडोलींत रावण अवतरला ॥

३

काम-वासना झाली रावणाला-धन-लोभानं पीडिलें इंग्रजाला !
धर्म-नीतीचें बंधन नाहि त्याला !
आम्ही धनि सावकार !-प्रजा भाडें करणार
असा अन्याय दंडा गाजविला-बारडोलींत रावण अवतरला ॥

४

नोकरशाहीनें कारभार चालविला-शेतकऱ्याचा 'करभार' वाढविला
त्याला दारिद्र्यडोहांत बुडवीला.
आई खाऊं न देई – बाप मागूं न देई !
अशा पेंचांत पाडलं दुनियेला-बारडोलींत रावण अवतरला ॥

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1583
Date 18.1.72
GOVT. OF INDIA

५

बारडोलिचा आत्मा एकवटला-एक मुखानं धांवा चालविला
भक्त सखा श्री " वल्लभ " आठविला
काय पाहतोसि हरि-सख्या धांव सत्वरीं
करि सहाय्य रंजल्या गांजल्याला-बारडोलींत रावण अवतरला ॥

६

देव बोलत काय निजभक्ताला—जय होईल धर्माच्या पक्षाला.
तुम्ही सहावें सर्व कष्टाला
सत्य धर्मास सेवा-दृढ विश्वास ठेवा
नका वाकवुं मान अन्यायाला-बारडोलींत रावण अवतरला !

७

सरकारांत अर्ज गुदरविला—" कर अन्याय मार्गें वाढविला "
" नको छळूं रे राजा परजेला "
केलि विनवणि पाई-परि मानियली नाहीं !
" हंम् करे सो कायदा " गाजविला-बारडोलींत रावण अवतरला ॥

८

मग सीतेनें शुद्धी चालविली-बारडोलींत स्फूर्ती संचरली."
दिव्य प्रतीज्ञा जनता बोलियली.
" असा अन्यायाचा कर आम्ही नाहिं देणार ! "
ऐकुन नादीरशहा चवताळला-बारडोलींत रावण अवतरला ॥

९

सरकारानं होळी पेटविली-घरादाराचि आहुती त्यांत झाली !
भारी दंडुकेशाही चालविली
ज्यानें कर नाहिं दिले-त्याचें सर्वस्व गेलें !
असा सैतान नामवा नाचविला-बारडोलींत रावण अवतरला ॥

१०

वरि पठाण तेथें पाठविला-न्यायनितीचा त्यानें खून केला !

काय पुन्हां दु:शासन प्रगटविला !

वाह्वारे राजा-धन्य धन्य प्रजा !

केलं चकीत अवघ्या दुनियेला-बारडोलींत रावण अवतरला.

११

आमच्या कल्याणासाठीं येथें सरकार-आलें सोडून त्याचें घरदार !

उपकाराचें ओझें नाहिं फिटणार !

असे उपकार केले-अन्न मिळेनासें झालें !

किति वर्णावें दयावंत अंमलाला ?-बारडोलींत रावण अवतरला

१२

धन्य धन्य हो धन्य बारडोली—ही भारतमाता धन्य झाली

काय सत्याचि सीमा राहियली

हिंद-वासीहो—व्हावें जागृत हो !

बारडोलिंत रावण अवतरला-काय तुमच्यांत राम आहे तो बोला !

( पूर्वार्ध समाप्त )

---

( उत्तरार्ध )

पुढील ओव्यांची रचना बारडोली प्रकरणांत सरकारनें श्री. वल्लभभाईच्या अटी मान्य केल्यावर सर्व हिंदुस्थानभर या सत्याग्रह युद्धाच्या विजयार्थ म्हणून जो "बारडोली दिन" ता. १२ जून १९२९ ला पाळला गेला त्या दिवशीं केली आहे.

( चाल-डफावरील गाण्यांची )

१

कलियुगांत सत्यंजय झाला-बारडोलीनें झेंडा फडकवला ॥ धृ० ॥

सत्यपरीक्षा देते बारडोली-दिव्य अग्निशीं खेळते बारडोली.
धर्मवीरांस गति ही ठरलेली
झाला प्राणांत जरि—सत्य सोडीना तरि
हरि सहाय्य करितो भक्ताला-बारडोलीनें झेंडा फडकविला ॥

२

माझ्या राज्यांत सूर्य मावळेना-अशि जगांत मिरवितो वल्गना.
मोठा दरारा दावितो दुबळ्यांना
जागीं बलवंत थोर-आम्हि अंग्रज बहादुर !
बहादुराला पायारिं-खेळविला-बारडोलीनें झेंडा फडकाविला !

३

येवढ्या सामर्थ्यवंता सरकारला-बारडोलीनें आणलं जेरीला !
काय शेळीनं जिंकावं वाघाला ?
बारडोली बलवंत-झाली कैशि हा वृत्तांत
ऐका विनवितो कवि श्रोत्याला-बारडोलीनें झेंडा फडकवला.

४

सती द्रौपदि छळितो दुःशासन-झाले वसनरूप श्रीभगवान
करिं घेऊन आले सुदर्शन
करि दिव्य सुदर्शन—बारडोलीचं रक्षण.
सरकाराच्या वर्माला घाव बसला-बारडोलीनें झेंडा फडकविला,

५

खादी वेषांत नटली बारडोली-ऐक्यभूषण ल्याली बारडोली
निर्व्यसन झाली बारडोली
भेद विसरूनि पार—केला अस्पृश्यउद्धार
दिव्य मुक्तीचा सोपान दाखविला-बारडोलीनें झेंडा फडकविला ॥

६

दुर्योधनाच्या गर्वानं काय केलें ?–पांचि पांडव वनवासांत नेलें
नानापरीनं त्यांचे छळ केले !
त्यानं सत्ता मिरविली--सत्य विसरूनि गेला
सत्ताधारी दुर्योधन नमवीला-बारडोलीनें झेंडा फडकाविला !

७

नाहि हातांत घेतली तरवार-नाहिं तोफांचा केला भाडिमार
झाले जीवास उदार धर्मवीर
सर्व बलाचेंहि बल-जागीं असें आत्मबल.
असा गांधींच्या तत्वाचा जय झाला–बारडोलीनें झेंडा फडकाविला !

८

नाहिं पापांचे साह्यकारी होणार!–आम्हि अन्याय नाहीं साहणार
नाहि पाशवी सत्तेला नमणार !
असा निश्चय केला–आचरून दावियला
सरकाराचा नक्षा उतरवला--बारडोलीनें झेंडा फडकवला ॥

९

ध्रुव प्रल्हाद यांची जन्मभूमी–हरिश्चंद्रादिकांची जन्मभूमी.
आर्यभूमीचें जग हें अनुगामी
जिथं सत्य हाचि देव–जिथं सत्य हाचि धर्म–
तिथं सत्याचा जय हा ठरलेला–बारडोलीनें झेंडा फडकाविला !

संपूर्ण

स्वातंत्र्य-देवीचा
विजय असो.